


दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १९०●गुरूवार,दि.०९ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



# आरक्षण सुटलं, लागा कामाला

## बीड न.प.च्या २६ प्रभागातील ५२ जागांपैकी २६ जागांवर महिलाराज

### खुल्या प्रवर्गाच्या १६ महिला नेतृत्व करणार

**बीड । प्रतिनिधी**

**राजकीयदृष्टट्या संवेदनशील असलेल्या बीड जिल्ह्यातील ६ नगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत त्या त्या नगरपालिकांच्या सभागृहांमध्ये पार पडली. बहुउत्सुकता असलेल्या बीड नगरपालिकेसाठी शहरातील २६ प्रभागातील ५२ जागांसाठी आज नगरपालिकेच्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहामध्ये सोडत पार पडली. ५२ पैकी २६ जागा महिलांसाठी आरक्षित राहिल्या असून ही सोडत झाल्यानंतर इच्छुकांमध्ये कही खुशी कही गम पहायला मिळाले.**

बीड नगरपालिकेवर २०२२ पासून प्रशासक नियुक्त आहे. गेल्या तीन वषारच्या कालखंडात निवडणुका न झाल्याने स्थानीक स्वराज्य संस्था निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर इच्छुकांमध्ये आनंदाचे डोही आनंद तरंग असे वातावरण निर्माण झाले. दोन दिवसांपूर्वी बीड न.प. अध्यक्षपद हे एस.सी. महिला प्रवर्गासाी सुटल्यानंतर अनेक इच्छुकांच्या स्वप्नांवर विरजन पडले. आजा नगरसेवक पद तरी हाती लागतय का? याकडे सवारचे लक्ष लागून होते आणि न.प.च्या लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे गोपीनाथराव मुंडे सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या अध्यक्षतेखाली २६ प्रभागातील ५२ जागांसाठी सोडत झाली. ही सोडत चिठ्ठी पद्धतीने काढण्यात आली असून यासाठी संस्कार विद्यालयातील विद्याथ्यारना बोलवण्यात आले होते. यामध्ये प्रेरणा सुशील ढोले, माने या दोघांच्या ▶▶ उर्वरित पान २

## अंबाजोगाईच्या शहरात स्त्री शक्तीचा जयजयकार



**● ३१ जागांपैकी १६ जागा महिलांसाठी राखीव**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील नगर परिषदेच्या अध्यक्षपदांच्या आरक्षण सोडती झाल्यानंतर प्रभागातील आरक्षण सोडत झाली. अंबाजोगाईतील १५ प्रभागातील ३१ जागांसाठी ही सोडत काढण्यात आली असून १६ जागांवर महिला निवडणूक लढवणार आहे तर १५ जागांवर पुरुष निवडणूक लढवणार आहेत. अंबाजोगाई नगरपालिकेच्या स्व. विलासराव देशमुख सभागृहामध्ये उपजिल्हाधिकारी दीपक वांधळे यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## परळी नगर पालिका वार्डाची आरक्षण सोडत जाहिर

**बीड । प्रतिनिधी**

परळी नगर पालिका वार्डाची आरक्षण सोडत आज सकाळी जाहिर करण्यात आली आहे. चिठ्ठी काढून आरक्षणाची सोडत काढण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, संतोष रोडे यांची उपस्थिती होती. प्रभाग क्रं.१ ओबीसी महिला- सर्व साधारण, प्रभाग क्रं. २ एससी महिला- सर्वसाधारण, प्रभाग क्रं. ३ ओबीसी



- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रं. ४ एससी- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रं. ५ ओबीसी महिला- सर्वसाधारण, प्रभाग क्रं.६ ओबीसी महिला -सर्वसाधार, प्रभाग क्रं. ७ ओबीसी महिला-सर्व साधारण, प्रभाग क्रं. ८ एससी महिला- सर्वसाधारण, प्रभाग क्रं.९ एससी- सर्व साधारण, प्रभाग क्रं.१० एससी महिला- ▶▶ उर्वरित पान २ वर

## धारूर न.प.चे आरक्षण जाहिर

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर नगर पालिकेमध्ये दहा प्रभाग असून या प्रभागाचे आज नाट्यगृहामध्ये आरक्षण जाहिर करण्यात आले आहे. अध्यक्षपद हे सर्व साधारण पुरूष जागेसाठी सुटलेले आहे. आज सकाळी शहरातील नाट्यगृहामध्ये आरक्षणाची सोडत काढण्यात आली आहे. या वेळी उपजिल्हाधिकारी धुमाळ, सीओ ढेपे यांची उपस्थिती होती. शहरामध्ये दहा प्रभाग असून एका प्रभागामध्ये दोन नगरसेवक राहणार आहेत. प्रभाग क्रं. १ अ सर्व साधारण महिलेसाठी सुटले आहे तर ब सर्वसाधारण, प्रभाग २ अ अनुसुचित जाती महिला ब सर्व साधारण, प्रभाग ३ अ अनुसुचित जाती महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ४ अ नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला ब सर्व साधारण, प्रभाग ५ अ नागरीकांचा मागास प्रवर्ग सर्व साधारण ब सर्व साधारण महिला, प्रभाग क्रं. ६ अ सर्व साधारण महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ७ नागरीकांचा मागास प्रवर्ग सर्व साधारण ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव नगरपालिकेचे आरक्षण जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव नगर पालिकेच्या नगरसेवकाची आरक्षण सोडत आज सकाळी जाहिर करण्यात आली आहे. यावेळी न.प.च्या सीओसह आदी अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. चिठ्ठी काढून आरक्षणाची सोडत जाहिर करण्यात आली आहे. प्रभाग क्रं. १ अ नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं.२ अ अनुसुचित जाती महिला ब सर्वसाधारण, प्रभाग



क्रं. ३ अ नामाप्र ब सर्व साधारण महिला, प्रभाग क्रं. ४ अ नामाप्र ब सर्व साधारण महिला, प्रभाग क्रं. ५ सर्व साधारण महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ६ अ सर्व साधारण महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं.७ अ नामाप्र महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ८ नामाप्र महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ९ अ ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराईत ११ प्रभागातील २२ जागांची आरक्षण सोडत

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सातत्याने चर्चेत राहणारी नगरपालिका म्हणून गेवराई नगरपालिकेकडे पाहिले जाते. येथील अध्यक्षपद हेसर्वसाधारणसाठी सुटल्यानंतर ११ प्रभागातील २२ जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये ११ जागांवर महिला निवडणूक लढविणार आहेत.

गेवराई नगरपालिकेच्या सभागृहामध्ये उपजिल्हाधिकारी प्रबोधय मुळे यांच्या अध्यक्षतेखाली न.प.चे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या उपस्थितीत चिठ्ठी काढून ११ प्रभागातील २२ जागांसाठी सोडत काढण्यात आली. यामध्ये प्रभाग क्र. १ -अ- सर्वसाधारण महिला, ब- खुला, प्रभाग क्र. २ अ- ना.मा.प्र. ओबीसी, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ३ अ- ना.मा.प्र. ओबीसी, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ४ अ-ना.मा.प्र., ब- खुला, प्रभाग क्र. ५ अ-ना.मा.प्र. ओबीसी, ब- सर्वसाधारण, महिला, प्रभाग क्र. ६ अ-अनुसुचीत जाती, ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ७ अ- ▶▶ उर्वरित पान २

# कापुस शेतीला बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाई द्या

## आ. विजयसिंह पंडित यांची कृषी राज्यमंत्र्यांकडे मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

कापुस उत्पादक शेतकर्यांना जिरायती क्षेत्राच्या वर्गवारी नुसार अतिवृष्टीची नुकसान भरपाई दिली जात असल्या प्रकरणी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी आज लेखी निवेदन देवुन कापुस शेतीला बागायती शेतीसाठी दिली जाणारी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राज्याचे कृषी



राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल यांच्याकडे केली. बागायती वर्गवारी साठी आवश्यक असलेले सर्व निकष कापुस शेतीला लागु होत असल्यामुळे नुकसानग्रस्त कापुस उत्पादक शेतकर्यांना प्रति हेक्टरी २७ हजार ५०० रुपये प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम द्यावी अशी म ागणी त्यांनी लेखी निवेदनाव्दारे केली आहे. या प्रकरणी ▶▶ उर्वरित पान २ वर

## तहसिलच्या रेकॉर्ड रूममध्ये कर्मचारी शेतकऱ्यात बाचाबाची

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नगर रोडवर असलेल्या रेकॉर्ड रूममध्येआज दुपारी शेतकरी आणि कर्मचाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली. या बाचाबाचीमुळे सदरील कार्यालयात एकच गोंधळ निर्माण झाला होता. महिना उलटूनही कागद मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी कर्मचाऱ्यास जाब विचारला या वरून वादावादी झाल्याचे सांगण्यात आले आहे. तहसिल कार्यालयामध्ये रेकॉर्ड रूम आहे. सदरील रेकॉर्ड रूममध्ये जुने कागदपत्र उपलब्ध होत आहेत. कित्येक शेतकरी दररोज या ठिकाणी कागदपत्रासाठी येत असतात. मात्र त्यांना वेळेवर कागदपत्र मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. आज शेतकरी आणि कर्मचाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला. एक महिना उलटूनही कागदपत्र मिळत नसल्याने शेतकऱ्याने कर्मचाऱ्यास जाब विचारल्याने शेतकरी कर्मचाऱ्यात बाचाबाची झाली असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान पैसे दिल्याशिवाय कागद मिळत नसल्याचा आरोप शेतकऱ्याकडून केला जात होता.

# नाशिक हादरले! आईचा खून करुन मुलगा पोलीस ठाण्यात पोहोचला

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. पोटच्या मुलानेच आईची हत्या केल्याचे समोर आले आहे. वयोवृद्ध आईचा गळा दाबून मुलानेच खून केल्याचे समोर आले आहे. इतकंच नव्हे तर स्वतःहून पोलीस ठाण्यातदेखील हजर होत हत्येची कबुली दिली. नाशिक रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जेलरोड शिवाजीनगर येथील अष्टविनायक नगर येथे अरविंद मुरलीधर पाटील याने त्याची वृद्ध आई यशोदाबाई मुरलीधर पाटील वय ८६ यांची गळा दाबून हत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेने नाशिकमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

आरोपी मुलगा अरविंद पाटील हत्या करून स्वतःच नाशिकरोड पोलीस ठाण्यात हजर झाला व मी माझ्या वयोवृद्ध आईच्या वृद्धपणाला कंटाळून तिची गळा दाबून हत्या केली आहे मला अटक करा असे सांगितल्याने त्याला ताब्यात घेत त्याच्या राहत्या घरी पोलिसांनी पाहणी केली असता घरात त्याची वयोवृद्ध आई यशोदाबाई पाटील यांचा मृतदेह आढळून आला. आरोपी मुलाविरोधात नाशिक रोड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा केला असून आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

अरविंद उर्फ बाळू पाटील हा मनोरुग्ण असल्याचे समोर आले आहे. तो विवाहित असून त्याच्या या मानसिक आजाराला कंटाळून त्याची पत्नी देखील त्याला सोडून गेलेली असल्याने आई आणि हे दोघंच या ठिकाणी राहत होते. या घटनेची माहिती कळताच सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी, नाशिक रोडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे आदींसह अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. मुलानेच केलेल्या वयोवृद्ध आईच्या हत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात होती.




# आता निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांनाही मिळणार मदत, दुष्काळी सवलतीही लागू

**मुंबई । प्रतिनिधी**

अस्मानी संकटामुळे खचलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. पूरग्रस्त भागात नुकसानीसाठी तातडीची १० हजाराची मदत देण्यात आली आहे. अशा संकट काळात अन्नदाता बळीराजाच्या मदतीसाठी शासन धावून आले आहे. खरडून गेलेल्या जमिनींना प्रति हेक्टरी ४७ हजार रूपये मदत देण्यात येणार आहे. तसेच मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) मधून तीन लाख रूपये प्रति हेक्टरी देण्यात येतील. रब्बीच्या हंगामासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १० हजाराची मदत मिळणार आहे. केंद्र शासनाकडे



प्रस्ताव सादर झाल्यानंतर केंद्रही शेतकऱ्यांना मदत करणार आहे. निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांनाही मदत शेतकऱ्यांना मदत देताना ॲग्रीस्टॅकमधील माहिती ग्राह्य थरली जाणार आहे. मदतीसाठी शेतकऱ्यांना कुठलीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. जे शेतकरी मदतीच्या निकषात बसणार नाहीत, त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत दिली जाणार आहे. साखर कारखान्यांच्या नफ्यातून प्रति टन ५ रुपये कापण्याच्या निर्णयावर टीका होत असून, त्याबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, या पाच रुपयांचा विचार केला तर फक्त ५० कोटी रुपये मिळतात. कारखान्यांकडून हे पैसे घेतले ▶▶ उर्वरित पान २ वर

## तारीख पे तारीख..! शिवसेना पक्ष-चिन्हावर सुप्रीम कोर्टातील सुनावणी पुन्हा लांबणीवर

**मुंबई । प्रतिनिधी**


केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविरोधात शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर आज सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने १२ नोव्हेंबरपासून अंतिम सुनावणी होईल, असे न्यायमूर्ती सूर्यकांत, उज्ज्वल भुयान आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती सूर्यकांत, उज्ज्वल भुयान आणि एनके सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.




ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी ठाकरे गटाच्या वतीने युक्तीवाद केला. महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुका जानेवारीमध्ये आहेत. कृपया लवकरात लवकर सुनावणी घ्या. कारण हा पक्ष नाव आणि चिन्हाचा प्रश्न आहे, अशी विनंती सिब्बल यांनी केली. यावर न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणी आम्ही १२ नोव्हेंबर २०२५ पासून अंतिम सुनावणी घेवू.

# 'होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी'




शिवरायांनी आपल्या अनेक छोट्या-छोट्या मावळ्यांच्या मदतीने प्रचंड मोठे हिंदवी स्वराज्य निर्माण केले ; परंतु स्वराज्य निर्माण करताना, अनेक मौल्यवान हिरे लयाला गेले. त्यांच्या या कार्यात तन-मन-धनाने या सर्वांनी सहकार्य केले.यात सर्वात महत्त्वाची भूमिका शिवरायांचे अंगरक्षक जिवाजी महाले यांची होती. प्रतापगडाच्या पायथ्याशी मु. पो. कोंडवली, जि. सातारा येथील साकपाळ कुटुंबात वीर जिवाजींचा जन्म ९ ऑक्टोबर १६६५ (अश्विन शुद्ध ६ शके १५५७) रोजी झाला. आईवडिलांच्या निधनानंतर जिवाजी आणि त्यांच्या भावंडांचा सांभाळ देव महाले या आप्ताने केला. तेव्हापासून त्यांचे आडनाव महाले पडले. बालपणापासून त्या काळी आलेल्या धकाधकीच्या संकटातून लढायांच्या काळात मुलांना लढाईचे प्रशिक्षण दिले जायचे. जिवाजीसुद्धा साता-याच्या तालमीतला लाल मातीत मेहनत करणारा पठ्ठा होऊ लागला. जोर, बैठका, तलवारबाजी, दांडपट्टा चालवणे याचे शिक्षण त्याला मिळाले होते. मातीत कुस्त्या खेळणे या प्रशिक्षणात तो चांगला पारंगत झाला. जिवाजी दांडपट्टा तर असा फिरवायचा की पायाच्या टाचेखाली ठेवलेल्या लिंबाचे तो डोळ्याचे पाते लवते ना लवते तोच दोन तुकडे करायचा. उंच उड्या मारण्यात तर तो निष्णात होता. उड्डाण मारल्यावर हवेतच शत्रूच्या शरीराचे दोन तुकडे करत असे. शिवाय त्याची नजर तीक्ष्ण होती. शिवरायांना जेव्हा जिवाजी महालेविषयी समजले ; तेव्हा त्यांनी जिवाजीला खास सैन्यात दाखल करून घेतले. तरणाबांड-भरदार मान-जाड पल्लेदार मिशा, सरळ नाक, भलेमोठे कपाळ आणि भेदक नजर पाहताच शत्रूलाही कापरे भरत होते.

शरीराने वाघ-सिंह ज्याप्रमाणे भक्ष्य पकडण्यासाठी धावतात त्याप्रमाणे तो अतिशय चपळ होता. शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूरच्या दरबारात बडी बेगमने सर्व मातब्बर सेनापती, सरदारांना बोलावले होते. तिने सर्वांना सवाल केला, शिवाजीला कोण पकडून आणेल ? दरबारात तर शांतता पसरली. तेवढ्यात मागून एक प्रचंड देहाचा, पायातील वहाणा कर्रकर्र वाजवत दरबारात आला. त्याने बडी बेगमचे आव्हान स्वीकारले. अफजल खान निश्चितच हे काम फत्ते करणार असा विश्वास तिला वाटू लागला. भल्याबु-या मार्गाने किंवा विश्वासघाताने अनेक शत्रूंना संपवण्यात तो तरबेज होता. अफजल खान आपल्यासोबत हजारो सैनिक, घोडदळ-पायदळ घेऊन मजल दरमजल करत महाराष्ट्रात दाखल झाला. तेव्हा शिवराय रायगडावर होते. रायगड सोडून शिवरायांनी प्रतापगडावर जाण्याचा विचार केला.

कारण प्रतापगड सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय योग्य किल्ला होता. शिवाय डोंगरी किल्ला असल्याने एकावेळी एकच व्यक्ती तेथे जाऊ शकत होती. आजूबाजूचा परिसर संपूर्ण जंगलाने वेढलेला, त्यात हिंस्र पशू-प्राणी, जंगली श्वापदांचा वावर असल्याने प्रतापगडावर जाणे खूपच अवघड होते. शिवराय प्रतापगडावर पोहोचल्याचे वृत्त समजताच अफजल खान खूप चिडला. त्याने हिंदू देवदेवतांची देवळे पाडण्यास सुरुवात केली. त्यामुळे तर शिवाजीराजे खाली येतील असा त्याचा कयास होता. शिवरायांना ही नीती माहिती होती. ते पाहून त्याने सेवकामार्फत शिवाजीराजांना भेटण्याचा निरोप पाठवला, तुम्ही माझ्या मुलांसारखे ; मला भेटण्यास या, आमचे किल्ले परत द्या, मी तुम्हाला बादशहाकडून जहागिरी देतो. शिवरायांनी टोला मारला,मला तुम्हाला भेटायची भीती वाटते, तुम्ही प्रतापगडाच्या पायथ्याशी या. असे म्हणताच अफजल खान खुश झाला. भेटीची तारीख आणि वेळ ठरली. महाराजांनी सगळ्यांना कामे वाटून दिली. जिवा तुम्ही सय्यद बंडावर नजर ठेवायची, असे सांगून त्यांना सोबत घेतले. भेटीचा दिवस उजाडला. प्रतापगडाच्या पायथ्याशी सुंदर शामियाना उभारण्यात आला होता. अफजल खानाचे मनोराज्य चालू होते. महाराज गडाच्या पाय-या उतरत असताना, थोड्या अंतरावर सय्यद बंडा उभा होता. जिवाजींनी सय्यद बंडाविषयीची माहिती महाराजांना दिली. त्याला तेथून दूर करण्यास सांगितले. महाराजांनी वकिलामार्फत निरोप पाठवून सय्यद बंडास दूर करण्यास सागितले. अफजल खान, त्याचा वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी शामियान्यात होते. अफजल खानाने शिवरायांना दोन्ही हात हवेत पसरून आलिंगन दिले. त्यांची मान डाव्या कुशीत दाबून ठेवली आणि उजव्या हाताने कट्यारीने पाठीवर वार केला. अंगात चिलखत असल्याने कट्यार घसरत गेली. अंगरखा टराटरा फाटत होता. शिवरायांनी क्षणाचाही विलंब न लावता अस्तन्यात लपवलेला बिचवा काढून खानाच्या पोटात खुपसला. शिवरायांवर त्याच्या वकिलाने हल्ला चढवला. शिवाजीराजांनी कृष्णाजी कुलकर्णी याचेही तलवारीने दोन तुकडे केले. इकडे सय्यद बंडा गोंधळाचा आवाज ऐकून धावत आला. महाराजांवर हल्ला करणार इतक्यात जिवा महालेने सय्यद बंडाचा समशेर असलेला हात वरच्यावर हवेत कापला. शिवरायांनाही या चपळाईचे कौतुक वाटले. तेव्हापासूनच 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' हा वाक्प्रचार रूढ झाला. सुरतेच्या स्वारीतही जिवाजींनी महाराजांना वाचवल्याची नोंद आहे. वीर जिवाजी महाले यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन लाखोंचा पोशिंदा छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचविले होते. त्यांच्या बलिदानाचे स्मरण व्हावे यासाठी दरवर्षी विविध ठिकाणी जिवा महाले यांची ९ ऑक्टोबर ला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मोठया उत्साहात साजरी केली जाते.

संकलन / लेखन
प्रा.सोमीनाथ खंडागळे

◆ पान ९ वरून पुढे...

## आरक्षण सुटलं...

हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. यावेळी सीओ शैलेश फडसे, अतिरिक्त सीओ सम्राट कदम यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, सर्वसामान्य उपस्थित होते. ५२ नगरसेवकांपैकी १६ जागा या खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षीत ठेवण्यात आले आहे. प्रभाग क्र. १ अ ना.मा.प्र. ओबीसी, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २ अ - ना.मा.प्र. ओबीसी महिला, ब - सर्वसाधारण, प्रभाग क्र. ३ अ अनुसुचीत जाती महिला, ब - सर्वसाधारण, प्रभाग क्र. ४ अ - अनुसुचीत जाती, ब-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ५ अ -ना.मा.प्र. ओबीसी, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ६ अ - ना.मा.प्र. ओबीसी महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. ७ अ-सर्वसाधारण महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. ८ अ- ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ९ अ- सर्वसाधारण महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १० अ- ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. अ- ना.मा.प्र. महिला , ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १२ अ- अनुसुचीत जाती, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १३ अ- अनुसुचीत जाती महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १४ अ - अनुसुचीत जाती, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १५ अ- सर्वसाधारण महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १६ अ- ना.मा.प्र. महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. १७ अ ना.मा.प्र, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १८ अ- ना.मा.प्र. महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. १९ अ- ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २० अ- सर्वसाधारण महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. २१ अ - सर्वसाधारण महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. २२ अ - ना.मा.प्र. महिला, ब-सर्वसाधारण, प्रभाग क्र. २३ अ- ना.मा.प्र., ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २४ अ- ना.मा.प्र. महिला, ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र. २५ अ - सर्वसाधारण महिला ब- सर्वसाधारण, प्रभाग क्र.२६ अ- अनुसुचीत जाती महिला, ब- सर्वसाधारण एकूण ५२ नगरसेवकांमध्ये २६ महिला नगरसेवक म्हणून नगरपालिकेमध्ये काम करणार आहेत. आजची आरक्षण सोडत सुटल्यानंतर अनेक वाडारमध्ये कही खुशी कही गम पहावयास मिळाले. काही इच्छुकांना आपल्या वार्डात इच्छेनुसार

◆ पान ९ वरून पुढे...

आरक्षण पडले नाही तर काहींना अचानक आरक्षण पडल्याने लॉटरीही लागली.

## अंबाजोगाईच्या शहरात...

अध्यक्षतेखाली ही सोडत झाली. या वेळी तहसीलदार विलास तरंगे, मुख्याधिकारी प्रियंका ठोंगे, कार्यालयीन अधीक्षक शेख इफ्तेखार यांच्यासह विविध पक्ष, संघटनेचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. अंबाजोगाई नगरपालिकेचे नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण पुरुषसाठी सुटले असून १५ प्रभागातील ३१ जागांसाठी सोडत झाली. प्रभाग क्रमांक १ मधील अ सर्वसाधारण खुला, ब सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. २ अ ना.मा.प्र. (ओबीसी) ब - सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ३ अ सर्वसाधारण खुला, ब सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ४ अ ना.मा.प्र. ओबीसी महिला, ब सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ५ अ अनुसुचीत जाती खुला, ब - सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ६ अ ना.मा.प्र. ओबीसी खुला, ब सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ७ अ ना.मा.प्र. खुला, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ८ अ. ना.मा.प्र. महिला, ब सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ९ अ सर्वसाधारण खुला, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १० अ ना.मा.प्र. महिला, ब- सर्वसाधारण खुला प्रभाग क्र. ११ अ- अ.जा. महिला, ब - सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. १२ अ ना.मा.प्र. खुला, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १३ अ अ.जा. खुला, ब- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १४ अ - अ.जा.महिला, ब- सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. १५ या प्रभागात ३ सदस्य आहेत. यामध्ये अ - अ.जा.महिला, ब- ना.मा.प्र. महिला, क- सर्वसाधारण खुला असे आरक्षण पडले असून ३१ जागांपैकी १६ जागा या महिलांसाठी सुटल्या आहेत.

## परळी नगर...

ओबीसी महिला, प्रभाग क्रं. ११ एससी-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रं. १२ सर्व साधारण महिला-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रं.१३ एसटी-सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रं. १४ ओबीसी-सर्वसाधारण महिला, प्रभाग

◆ पान ९ वरून पुढे...

क्रं.१५ ओबीसी ५- सर्व साधारण महिला, प्रभाग क्रं.१६ ओबीसी महिला - सर्व साधारण, प्रभाग क्रं.१७ सर्व साधारण महिला - सर्व साधारण महिला अशा पध्दतीची आरक्षण सोडत काढण्यात आले तर परळी नगराध्यक्ष पद हे सर्व साधारण महिलेसाठी सुटलेले आहे.

## धारूर न.प...

ब सर्व साधारण महिला, प्रभाग ८ अ नागरीकांचा मागास वर्ग महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ९ अ नागरीकांचा मागास वर्ग महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. १० अनुसुचित जाती सर्व साधारण ब सर्व साधारण महिला अशा पध्दीचे आरक्षण जाहिर करण्यात आले आहे.

## माजलगाव नगरपालिकेचे...

नामाप्र ब सर्व साधारण महिला, प्रभाग क्रं. १० सर्व साधारण महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. ११ अ नामाप्र महिला ब सर्व साधारण, प्रभाग क्रं. १२ अ अनुसुचित जाती महिला ब सर्वसाधारण, प्रभाग क्रं. १३ अ अनुसुचित जाती ब सर्व साधारण महिला अशा पध्दतीचे आरक्षण सोडत जाहिर करण्यात आली आहे.

## गेवराईत 11...

अ.जा. महिला, ब- खुला, प्रभाग क्र. ८ अ- अ.जा. महिला, ब-खुला, प्रभाग क्र. ९ अ- सर्वसाधारण महिला, ब-खुला, प्रभाग क्र. १० अ- ना.मा.प्र. महिला, ब- खुला, प्रभाग क्र. ११ अ- ना.मा.प्र. महिला, ब- खुला असे आरक्षीत झाले आहेत.

## कापुस शेतीला....

आ. विजयसिंह पंडित यांनी राज्यमंत्री ना. आशिष जयस्वाल यांना लेखी निवेदन दिले आहे. या मागणीसाठी शेवट पर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे आ. पंडित यांनी सांगितले. मराठवाड्यात विशेषत: बीड जिल्ह्यात अतिवृष्टी व महापुर परिस्थितीमुळे शेतकर्यांचे सार्वाधिक नुकसान झाले आहे. बीड

◆ पान ९ वरून पुढे...

जिल्ह्यातही तुलनेने गेवराई विधानसभा मतदार संघात नुकासनीची दाहकता जास्त आहे. शासनाने ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्या बद्दल आ. विजयसिंह पंडित शासनानचे आभार मानले आहेत. मात्र प्रशासनाकडुन सुरु असलेल्या पंचनाम्याच्या अनुषंगाने त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेवराई विधानसभा मतदार संघात खरीप हंगामात कापुस पिकाचे सार्वाधिक क्षेत्र आहे, बहुतांश बागायत शेत जमिनीमध्ये कपाशीचे पिक घेतले जाते. तरीही कापुस उत्पादक शेतकर्यांना जिरायती पिकांसाठी दिली जाणारी नुकसान भरपाई मिळणार असल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी या बाबत आक्षेप नोंदविला आहे. या बाबत आ. विजयसिंह पंडित यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, गेवराई विधानसभा मतदार संघात सुमारे १ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड केली जाते. कापुस पिकासाठी विहीर, पाटपाणी, ठिबक सिंचन आदी माध्यमातुन पाणी दिले जाते. खत, बि-बियाणे, किटकनाशके आदींवर मोठा खर्च शेतकरी करतात. अलीकडच्या काळात अनेक शेतकरी कपाशीला पाणी देवुन फडतरीसह सुमारे आठ महिण्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी हे पिक घेत असल्यामुळे एका वर्षी एकच पिक शेतकर्यांना घेता येते. त्यामुळे बागायती वर्गवारी मधील सर्व निकष कापुस पिकाला लागु होतात. महसुल विभागाच्या वर्गवारी नुसार शासकीय अभिलेख्यात ज्या शेती जमिनीची वर्गवारी बागायती क्षेत्र म्हणुन केली आहे त्या क्षेत्रावर प्रामुख्याने कपाशीची लागवड झालेली दिसुन येते.

## आता निकषात....

जाणार आहेत, शेतकऱ्यांच्या एफआरपीमधून पैसे कापले जाणार नाहीत, असेही मुख्यमंत्री म्हणाले. पूरग्रस्तांसाठी अचानक तरतूद करावी लागल्यामुळे विकासकामांवर ताण येईल. काही ठिकाणी काही बाबींवर खर्च कमी करावा लागेल, असेही ते म्हणाले. दुधाळ जनावरांच्या मर्यादाची अट काढली- दुधाळ जनावरे दगावली असल्यास तीन जनावरांपर्यंतच मदत मिळत होती, आता ही मर्यादेची अट काढून टाकली आहे. रब्बी पिकांच्या नुकासनीसाठी प्रति हेक्टर १० हजार रुपये दिले जाणार आहेत. विहिरींच्या नुकसानीसाठी आतापर्यंत मदत मिळत नव्हती,

◆ पान ४ वरून पुढे...

## कपिलधारवाडीत भीतीचे....

सविस्तर चर्चा करण्यात आली . महिलांना साड्या वाटपाचा उपक्रम - संवेदनशील प्रशासनाचे दर्शन . घटनेनंतर स्थलांतरित नागरिकांसाठी मन्मथस्वामी देवस्थान परिसरात कॅम्प सुरू आहे. प्रशासनाच्या वतीने महिलांना दिलासा देण्यासाठी आज बीड तहसील कार्यालय आणि महिला अधिकारी, कर्मचारी यांच्या वतीने साड्या व आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले . या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी शीतल चाटे , तसेच ग्रामस्थ प्रतिनिधी उपस्थित होते . महिलांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले . भेगांनी हादरलेले गाव - स्थलांतर , अन्नधान्य व मदतकार्य सुरूच : गायरान जमीन गट क्रमांक ६११ मध्ये वसलेली कपिलधारवाडी वस्तीतील ९० ते १०० घरांना जमीन सरकण्याचा फटका बसला आहे . ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी घटनेनंतर गावातील सर्व कुटुंबांना सुरक्षिततेसाठी मन्मथस्वामी देवस्थान मंदिर परिसरात स्थलांतरित करण्यात आले . प्रशासनाने तातडीने चहा, पाणी, नाश्ता व राहण्याची सोय केली . १ ऑक्टोबर रोजी पोलिस विभाग व एनजीओ यांच्या सहकार्याने अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले . २ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय बीड मार्फत १७ गव्हाचे पोते व १७ तांदळाचे पोते देवस्थान येथे सुरक्षित ठेवून अन्नपुरवठ्याची सततची व्यवस्था करण्यात आली आहे .
२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही प्रत्यक्ष पाहणी करून सांगितले की , तांत्रिक समितीमार्फत सखोल तपासणी करून कायम स्वरूपी पुनर्वसन अथवा आवश्यक उपाययोजना केल्या जातील . नरेगा अंतर्गत मजुरीची गरज असणाऱ्यांना कामे देण्यात येतील , तसेच स्थलांतरित ग्रामस्थांची अन्न व निवाऱ्याची सोय प्रशासन करेल .

## अखिल भारतीय ...

भव्यदिव्य शाखेचे उद्घाटन केल आहे या शाखेच्या उद्घाघाटन अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री.गोपाळराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले, यावेळी उपस्थित, अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा विभागीय सरचिटणीस श्री.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हाअध्यक्ष बापूसाहेब साळुंखे, युवक जिल्हाध्यक्ष श्री.भागवत मस्के पाटील, तालुका उपाध्यक्ष शिवाजीराव हिंदोळे, जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर बप्पा कवचट, बीड जिल्हा उपाध्यक्ष बापूसाहेब मराडे,जिल्हा सरचिटणीस बंडू आप्पा कोलंगडे,श्री.प्रकाशराव काळे, शहराध्यक्ष दत्ता शेळके, तालुका उपाध्यक्ष रवी जोगदंड, बाबू भोसले, प्रवीण जटाळ, विशाल कोलंगडे,शायलेस शिंदे, इंगोले, दिवे, धनवडे, कोटूळे ,घोलप,व वरवटी व आहेर धानोरा बीड येथील अनेक कार्यकर्ते या शाखा उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते......

## सामाजिक बांधिलकी....

शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. अनेकांची पिके नेस्तनाबूत झाली. अनेकांची घरे पडली.सांडस चिंचोली सारख्या गावांमध्ये तर संपूर्ण गावाला पाण्याचा वेढा पडला होता. अशा परिस्थितीत लोकांचा संपर्क तुटल्याने लोकांना वाचवणे हा मोठा प्रश्न होता. अनेकांना एनडीआरएफ च्या पथकाने

◆ पान ४ वरून पुढे...

बाहेर काढले. तशीच परिस्थिती देपेगाव,सांडस चिंचोलीची होती. या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात गावामध्ये पाणी घुसले आता परिस्थिती पूर्व पदावर येत असून शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना धान्यापासून ते वस्तू पर्यंत सर्वच गोष्टीच्या मदतीची गरज आहे. अशा परिस्थितीत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, डेपेगाव, मंजरथ ,सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला या गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप करून काही प्रमाणात का होईना पूरग्रस्तांना दिलासा दिला. यावेळी बोलताना एस.एम.देशमुख म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. मराठवाडा आणि सोलापूर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सोलापूर आणि मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये शक्य होईल तेवढी मदत देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील या पाच गावांना ब्लँकेट चे वाटप करण्यात येत आहे. परिषदेच्या वतीने पत्रकारांचे प्रश्न तर सोडवण्यासाठी संघर्ष केला जातोच त्याबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडियाचे राज्याचे अध्यक्ष अनिल वाघमारे, माजलगाव तालुका अध्यक्ष हरीश यादव, पत्रकार पांडुरंग उगले, धनंजय माने, सुहास बोराडे, धम्मपाल डावरे या पत्रकारांसह गावातील सरपंच, चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मुख्याध्यापक गणेश...

वाजण्याच्या सुमारास दु:खद निधन झाले. निधना समय त्यांचे वय ७७ वर्ष होते. सायंकाळी ०७: ३० वाजण्याच्या सुमारास संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. बीड शहरातील यशवंत नगर भागात रहिवासी असलेले साप्ताहिक कंकालेश्वर समाचारचे संपादक तथा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ सर हे मागील काही दिवसापासून आजारी होते. परवा सोमवार रोजी अचानक त्रास होऊ लागल्याने त्यांना शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना बुधवार दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ०३ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राण ज्योत मालवली. श्री गोविंदराव वाघ सर यांना बीड आणि परिसरात 'नाना' या नावाने ओळखले जात होते. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात नानांचे उल्लेखनीय काम होते. शिक्षक म्हणून नोकरी करत असतानाच नानानीं स्वत:च्या मुलांना उच्चशिक्षित केले आज त्यांची सर्व मुले शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या बरोबर नानांनी शिवाय सर्व समाज घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी स्वकर्तुत्वाने समाज उपयोगी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. सायंकाळी ७:३० वाजता त्यांच्या पार्थिवावर संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात

◆ पान ४ वरून पुढे...

आले. यावेळी बीड शहरासह जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रासह विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारीडॉक्टर, इंजिनिअर, वकील, संस्थाचालक मुख्याध्यापक, शिक्षक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री गोविंदराव वाघ यांच्या पश्चात पत्नी सुदामतीताई वाघ तिन मुले गणेश वाघ, नामदेव वाघ, दत्तात्रय वाघ, तीन सुना, एक मुलगी, जावाई, दोन बहिणी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. वाघ परिवाराच्या दु:खात दै. मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

## ओबीसी समाजाच्या....

यांच्या प्रमुख उपस्थितीत तर ओबीसी समाजातील अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या मेळाव्याच्या पूर्व नियोजनासाठी शुक्रवार दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरातील हॉटेल नीलकमल, नगररोड, बीड येथे सकाळी ११: ३० वाजता तातडीच्या महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या बैठकीस मराठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील समता परिषदेचे प्रमुख पदाधिकारी, विविध ओबीसी समाज संघटनांचे प्रमुख पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

## राजीव गांधी...

कामाची गतिमानता, कार्यालयाचे सुशोभिकरण, कार्यालयाची अभिमुखता यातुन आपण केलेल्या कामाचा ठसा उमटविण्यासाठी शासनाने आपणास हे अभियान उपलब्ध करुन दिले असल्याचे श्री सुयंवशी यांनी या प्रसंगी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना सुचित केले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी कविता जाधव,तहसीलदार तेजस्वीनी जाधव विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. प्रस्ताविकात अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक रिसरींळरलहळूरप.ारहरीरीहींर.सीं.ळप या लिंकवर ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत तसेच दि. ३/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे. स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने भरावेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत. मूल्यमापनासाठी वेळापत्रक- तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय समितीकडे थेट प्रवेशिका पाठविणाऱ्या कार्यालयांसाठी दि. १६ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर तालुका स्तरावरील निवड समितीने प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रमे तीन प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडे पाठविणे,दि. १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेबरजिल्हास्तरीय निवड समित्यांनी प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रमे तीन प्रस्ताव विभागीय निवड समितीकडे पाठविणे दि.

◆ पान ४ वरून पुढे...

१६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर. विभागीय निवड समित्यांनी त्यांचेकडे प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रमे तीन प्रस्ताव राज्य निवड समितीकडे सादर करणे.दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर.

## शेतकऱ्यांच्या विविध....

बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो, उद्धवसाहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है, शिवसेनेचा विजय असो, शेतकऱ्यांनची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे, सरसकट मदत झालीच पाहिजे , एकरी ५०,००० रु. मदत मिळालीच पाहिजे अशा गगनभेदी घोषणा शिवसैनिकांनी दिल्या यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी संपर्कप्रमुख व जिल्हाप्रमुखांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार यापुढेही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले , उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महुवाले,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, नितीन भैय्या धांडे,संजय महाद्वार, युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, उपतालुकाप्रमुख महादेव परसकर,तालुका सचिव नंदुभाऊ येवले, युवा नेते मुकेश भैय्या घुमरे ,तालुका सहसचिव संदिप भानप, कामगार नेते रविअणणा वाघमारे,माजी प.स. सदस्य नवनाथ प्रभाळे , विनोद गुंड पाटील, मच्छिंद्र सावंत,सर्कलप्रमुख रमेश नवले, उपसरपंच बाळासाहेब कुटे , मनिष कुटे ,आदेश कुटे ,रामू पैठणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजलगाव विकास....

उद्देश या कार्यक्रमामागे होता. सुरक्षितता ही केवळ शासकीय यंत्रणांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश या नाट्याद्वारे प्रभावीपणे मांडण्यात आला.या पथनाट्य सादरीकरणात सिंदफणा पब्लिक स्कूल चे सांस्कृतिक विभाग प्रमुख सखाराम जोशी यांच्यासह अनेक शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रवीण मडके, कृष्णा नवले, वरुणराज तौर, प्रवीण तिवारी, मलिक शेख,ज्योती जोशी, अर्चना जाधव, अश्विनी सोळंके या शिक्षकांनी आणि इयत्ता आठवीचा विद्यार्थी उसेद शेख तसेच मीना कदम या शिक्षकेतर कर्मचारी यांनी नाट्याला प्रभावी स्वरूप दिले. शिक्षकांच्या या सक्रिय सहभागामुळे सामाजिक जबाबदारीच्या संदेशाला अधिक वजन मिळाले. बस स्थानकासारख्या सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ज्वलंत आहे. या पथनाट्याद्वारे सार्वजनिक ठिकाणांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि नागरिकांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद आणि माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिवाजीराव पंडित परिवाराला नितिमत्तेचे फाऊंडेशन आहेः ह.भ.प.अर्जुनशास्त्री लाड



## शिवनगरीत पाचव्या दिवशी हरीनामाचा गजर

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई दि.८ (प्रतिनिधी) एक आदर्श आणि पोलादी व्यक्तिमत्त्व म्हणून शिवाजीराव पंडित यांचा उल्लेख करता येईल. आज ८८ वर्षं वय होऊन देखील त्यांचा उत्साह अजिबात कमी झालेला नाही. शिवाजीराव पंडित घराण्याला नितीमत्तेचे फाउंडेशन आहे. राजकीय घराणे असून देखील आपल्या मुलांवर योग्य संस्कार केल्यामुळे त्यांची पुढची पिढी राजकीय, सामाजिक व धार्मिक श्रेत्रात उत्तम काम करत आहे. शिवछत्र परिवाराने प्रामाणिकपणे केलेल्या साधुसंतांच्या सेवे मुळे त्यांना एक आदर्श घराणे म्हणून समाजमान्य प्रमाणपत्र मिळाले आहे असे प्रतिपादन ह.भ.प.अर्जुनशास्त्री लाड महाराज यांनी केले. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित किर्तन महोत्सवात ते बोलत होते. माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा आणि कीर्तन सोहळ्यात किर्तनसेवेचे पाचवे पुष्प ह.भ.प. अर्जुनशास्त्री लाड महाराज यांनी गुंफले. संत तुकाराम महाराज यांच्या एक एक संता ठाई लाभ पाई उत्तम या अभंगावर निरूपण करताना ते म्हणाले की संत सेवा कशी उत्तम आहे हे तुकाराम महाराज यांनी सांगितले आहे. देव आणि देवमान्य संत या दोन्हीची सेवा खरी सेवा असून संत नावाच्या मशिनरीतून टाकाऊ संसार गेला की उत्तम लाभ मिळतो. पाप रुपी संसाराला पुण्य रुपात आणायची ताकद संत सेवेत आहे. संसार रुपी झाडाला कितीही खतपाणी घाला तरी त्याला फळे फुले येत नाही तरी आपण त्यासाठी झगडतोय.

देवा पेक्षा संत सेवेला महत्व जास्त असून संतांची सेवा केली की देवाला पावते असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी शिवाजीराव पंडित यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सुंदर विवेचन केले. शिवछत्र परिवाराला नैतिक अधिष्ठान असल्यामुळे

हा परिवार आणि त्यांचे कार्यकर्ते सुखी आणि समाधानी आहेत. एक आदर्श घराणे म्हणून शिवछत्र परीवाराचा उल्लेख करता येईल. शिवाजीराव पंडित यांची पुढची पिढी तितकीच नैतिक आणि नम्र असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. यावेळी गायक कृष्णा ठाकुर, तुळशीरामआतकरे, ज्ञानेश्वर महाराज, बळीराम महाराज, रघुनाथ महाराज, मृदंगाचार्य शत्रुघ्न पठाडे यांच्यासह साधुसंत, अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवनगरीत अभंगवाणी बहरली

**सायंकाळच्या सत्रात संगीत अलंकार कृष्णा महाराज ठाकरे यांचा अंभगवाणी कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी आपल्या मधूर आवाजात विविध अभंग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले.**

# वाढदिवसानिमित्त जमा झालेल्या ३२ लाखांच्या निधीचा धनादेश नंदकिशोर मुंदडांनी केला मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये दिले योगदान; मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

**मुंबई । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत त्यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधीत योगदान देण्याचे आवाहन केले होते. या द्वारे जमा झालेल्या ३२ लाख ८४ हजार ८४० रुपयांच्या निधीचा धनादेश मुंदडा यांनी मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आ. नमिता मुंदडा यांची उपस्थिती होती.

मुंदडा यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तू, पुष्पगुच्छ किंवा सत्कार टाळून नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला नागरिक, कार्यकर्ते आणि शुभेच्छुकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी इच्छादानपेटीतून एकूण ३२ लाख ८४ हजार ८४० रुपयांची रक्कम जमा झाली. त्यातील ३१ लाख ८४ हजार ८४० रुपयांचा एक व १ लाख रुपयांचा दुसरा असा दोन धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीत सुपूर्त करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या योगदानाचे स्वागत करत म्हटले की, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी अशा स्वरूपाने पुढे यावे, हे अत्यंत प्रशंसनीय आहे. याप्रसंगी नंदकिशोर मुंदडा यांच्या समवेत अक्षय मुंदडा उपस्थित होते. राज्य सरकारने नुकतेच मराठवाड्यासह विविध भागांतील पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर मुंदडा यांच्यामार्फत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत दिलेल्या योगदानाचे कौतुक होत आहे.






## राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा अशोक विश्वंभर मुंडे याची पोलीस दलामध्ये निवड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील विद्यार्थी अशोक विश्वंभर मुंडे याची ठाणे पोलीस दलामध्ये निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, प्रा. निलेश शिंदे, डॉ. अनंथा गाडे यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमोलक संस्थेमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कडा येथिल गांधी महाविद्यालयामध्ये श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा, तालुका विधी सेवा समिती आष्टी व विधीज्ञ संघ आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते श्री अमोलक ऋषिजी म. सा. व सरस्वती देवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आष्टी न्यायालयाचे प्रमुख दिवाणी न्यायाधीश के. के. खोमणे, सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी. जी. इनामदार मॅडम, दुसरे सह दिवानी न्यायाधीश श्री. एम. आर. बडाख, आष्टी पोलीस स्टेशनचे पी एस आय एस. डी. शिंदे, फिरते विधी सेवा केंद्र



व लोक अदालत मोबाईल व्हॅनचे वाहन चालक हरिदास जगदाळे, नितिन उन्हाळे, आष्टी वकील संघाचे अध्यक्ष अजय जेवे, जेष्ठ विधीज्ञ ड. बाबुराव अनारसे, ड राकेश हंबर्डे, ड.अविनाश निंबाळकर, व वकील संघाचे कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडाचे विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर हे होते. तसेच व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त उपाध्यक्ष बाबुलाल भंडारी, संस्थेचे प्रधानमंत्री हेमंतकुमार पोखरणा, मानदमंत्री डॉ. महेंद्रकुमार पटवा, कोषाध्यक्ष डॉ. उमेशकुमार गांधी, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय जोशी यांनी करत असताना बालक संरक्षणविषयक कायद्याची माहिती दिली, संस्थेचे विश्वस्त उपाध्यक्ष बाबुलाल भंडारी यांनी अमोलक संस्थेविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये कायदेविषयक ज्ञान जाणून घेण्याची आवश्यकता विशद केली. आष्टी पोलीस स्टेशनचे पी एस आय एस. डी. शिंदे यांनी सायबर क्राईम व मोबाईल वापरताना विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. सह दिवाणी न्यायाधीश एम. आर. बडाख यांनी महिलाविषयक कायद्याविषयी मार्गदर्शन करताना विशाखा मार्गदर्शक तत्वे याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. न्यायमूर्ती श्रीमती पी. जी. इनामदार मॅडम यांनी मानसिक आरोग्याबद्दल विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी व याविषयी असणारे संरक्षक कायदे याची माहिती दिली.

# भागवत कथेत साजरे झाला भगवान श्रीकृष्ण - रुक्मीणी स्वयंवर विवाह सोहळा

### •जयसिंग पंडित यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**गेवराई । प्रतिनिधी**

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेत आज भगवान श्रीकृष्ण - रुक्मीणी स्वयंवर सोहळा संपन्न झाला. भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या मधूर वाणीतून उपस्थितांना भागवत कथा कथन करुन वातावरणात चैतन्य निर्माण केले. यावेळी शिवशारदा मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांच्यासह साधुसंत, अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, महिला पुरुष भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराईत शिवनगरीत सुरु असलेल्या भागवत कथेत समाधान महाराज शर्मा यांनी सातवे पुष्प गुंफले. यावेळी त्यांनी भगवान श्रीकृष्णची रासलीला कथन केली. यावेळी उपस्थित भाविक भक्तांनी आनंद साजरा केला. आजच्या कथेत भगवान श्रीकृष्ण



- रुक्मीणी विवाह सोहळा उपस्थित हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. यावेळी उपस्थित भाविक भक्तांनी नाचून आणि फुगड्या खेळून आनंद साजरा केला. यावेळी जयसिंग पंडित आणि समाधान महाराज शर्मा हेही नाचत आणि फुगड्या खेळत या आनंदात सहभागी झाले. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या भागवत कथेस भाविक भक्तांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

**समाधान महाराज शर्मा यांच्या गाडीच्या चालकाचेही झाला शुभमंगल** - भागवत कथेत भगवान श्रीकृष्ण रुक्मीणी स्वयंवर संपन्न झाल्यानंतर उपस्थित भाविक भक्तांच्या साक्षिने आणि साधुसंतांच्या उपस्थितीत भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांच्या गाडीचा चालक कृष्णा यांचा याप्रसंगी विवाह सोहळा संपन्न झाला. केशव धोंडिबा खेडकर चकलंबा यांचे सुपुत्र चि. कृष्णा आणि विजय निवृत्ती पालवे अहिल्यानगर यांची सुकन्या चि.सो.का. भक्ती यांचे शुभमंगल यावेळी झाले.

## पावसाच्या उघडिपीने पिंपळनेर परिसरात पिकांच्या काढणी, मळणीला वेग

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यात गेल्या १० दिवसांपासून सततचा पाऊस आणि अतिवृष्टीमुळे शेतातील खरीप हंगामातील मका, कांदा, बाजरी, उडीद,सोयाबीन यासारख्या पिकांच्या काढणी व मळणीच्या कामांना अडथळा निर्माण झाला होता. मात्र आता पावसाने उघडीप दिल्याने पिंपळनेर परिसरात पिकांच्या काढणी, मळणीसह शेतीकामांना वेग प्राप्त झाला आहे. अतिवृष्टीमुळे मक्याची कणसे,सोयाबीन शेतात भिजल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे आता पूर्ण होत आले आहेत. पावसाने उघडीप दिल्यामुळे काढणी आणि मळणीचे काम सुरळीत सुरू झाले असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसत आहे, असे प्रगतशील शेतकरी,बळीराम मेहेत्रे यांनी सांगितले. याचसोबत, नुकताच झालेला पाऊस तूर आणि ऊस यांसारख्या पिकांसाठी फायदेशीर ठरला आहे. या पावसामुळे नगदी पीक असलेल्या उसाच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच जमिनीतील पाण्याचे स्तर वाढल्याने अनेक विहिरी उफाळून पाण्याने भरल्या आहेत तर ओढे, नाले, तळी, पाझर तलाव आणि सिमेंट बंधारे पूर्ण क्षमतेने पाण्याने भरले आहेत. यामुळे आगामी वर्षात शेती व शेतकऱ्यांसाठी भरघोस उत्पन्नाचे संकेत आहेत. असे शेतकरी सांगत आहेत . पावसाची अजूनही शक्यता असल्याने शेतकरी व नागरिक वरुणराजाला पावसाने उघडीप देण्याची विनंती करत आहेत. नुकत्याच झालेल्या दमदार पावसामुळे चाराटंचाईचा प्रश्न मार्गी लागला असून, दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे.

# स्पर्धा परीक्षा अंतर्गत करीअरच्या विविध संधी सौ. के.एस.के. महाविद्यालयात श्रीमती स्वाती कदम यांचे मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा अंतर्गत करीअरच्या विविध संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन स्पर्धा परीक्षा समितीमार्फत करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ बीड येथील साठा अधिक्षक श्रीमती स्वाती कदम या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षांच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या विविध संधी, परीक्षांचे स्वरुप, यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले अभ्यासाचे नियोजन व रणनिती याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्व व त्याचे फायदे आणि विद्यार्थ्यांना करीअरच्या विविध संधी यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्याच बरोबर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे यांनी या क्षेत्रातील उज्वल भवितव्या बद्दल मोल्यवान मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर , महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, श्री. विश्वंभर देशमाने यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. इरलापल्ले पल्लवी यांनी केले. सुत्रसंचालन राज्याशात्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गणेश कदम तर आभार डॉ. संजय मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. पांडूरंग केदार, श्री संजय काळे व स्पर्धा परीक्षा समिती मधील सर्वांचे सहकार्य लाभले.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५१४ / २०२५

अंबादास वि. निरंक

ज्याअर्थी – रत्नप्रभा प्र.अंबादास रोकडे हे दिनांक १८.०३.२०२५ रोजी नेकनूर ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी–

१.अंबादास पि. भगवानराव रोकडे, वय– ७५ वर्षे, धंदा–शेती रा. नेकनूर, ता. जि. बीड, २. विलास पि. अंबादास रोकडे, वय ५३ वर्षे, धंदा–शेती रा. नेकनूर, ता. जि. बीड), ३. सारंग पि.अंबादास रोकडे, वय ४४ वर्षे, धंदा–शेती रा. नेकनूर, ता. जि. बीड, ४. मीरा भ्र. सतिश गाडेकर, वय–५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवाजी नगर, शिरुर (कासार), ता. शिरुर ((कासार) जि. बीड. ५. हेमा भ्र. शाम विभूते, वय – ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. बन्सीधर नगर, कॅनॉल रोड, ता. जि. बीड.

अर्जदार क्र. १ हे मयताचे पती आहे. तसेच अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ४ व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत, असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०३.११.२०२५ ही आहे.

आज दिनांक ०३.१०.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(ॲड. एस.बी. शिंदे यांचे मार्फत)

शिक्का

(स्वाक्षरीत) क. लिपीक

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. ०९ ऑक्टोबर २०२५ ● पान ४

## मदतीचे आवाहन



सर्व सहकारी बंधु भगिनी हो, शेळगाव, ता. परांडा येथील शाळेतील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदतीसाठी आपण आवाहन केलं होतं. आजपावेतो गाथा परिवार खाती जमा झालेल्या रकमेचा हिशोब खालीलप्रमाणे आहे. यात कोणाचे नाव राहिले असल्यास लक्षात आणून द्यावे. या निधीत कोणाला काही भर घालायची असल्यास दिनांक १०/१०/२०२५ पर्यंत आपली मदत पाठवावी म्हणजे सदर निधीचा उचित वेळेत उपयोग करता येईल. संजय वाघ शेवगाव ५००/-, (अज्ञात)११०१/-, तन्मय आखाडे, पुणे १०००/-, उल्हास पाटील. २१०००/-, मच्छिंद्र देवकर, पुणे. ५०००/-, रवींद्र पाटील, पुणे. १६५०/-, अमित येवले, पुणे. १६५०/-, प्रियांका अमोल खर्डे १०००/-, दत्तात्रय कदम, पिसोळ १०००/-, मुक्ता राऊत, पुणे. ३०००/-, अंबादास लष्करे, शेवगाव ५००/-, श्रीधर आखाडे, पुणे. १०००/-, रामेश्वर पानसरे, दुर्गापूर १००१/-, छाया पाईकराव. सं. न. ५००/-, राहुल ओझरकर, पुणे १०,०००/-, पूरग्रस्त शिक्षण निधी ५०,९०२/- जमा झाला आहे. अनंत सूर्यवंशी सर यांनी तिकडे ₹ ५०००/- जमा केले आहेत. कृपया, मदत करू इच्छिणाऱ्या उर्वरित सर्वांनी आपली मदत त्वरित गाथा परिवार खाती जमा करावी ही विनंती.

**● गाथा परिवार : यूनियन बँक ऑफ इंडिया, संगमनेर ●**
**खाते क्र. ५१०१०१००७०१६१९३**
**आय एफ एस – UBINO 538833**

# कपिलधारवाडीत भीतीचे वातावरण कायम

**रस्त्यांना भेगा, भिंतींना तडे – प्रशासन सतर्क, जिल्हास्तरीय बैठक व मदतकार्य सुरू; तहसीलदार चंद्रकांत शेळके व पथकाचे अविरत प्रयत्न सुरु**

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील पाली ग्रामपंचायत अंतर्गत कपिलधारवाडी येथे गेल्या काही दिवसांपासून झालेल्या सततच्या आणि अतिवृष्टीमुळे जमीन खचल्याने अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत, तर सिमेंट व डांबरी रस्त्यांवर खोल भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे . या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मंगळवारी तातडीने बैठक घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसंबंधी उपाययोजना सुरू केल्या आहेत.

खासदार व अधिकाऱ्यांची आज सायंकाळी भेट : दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळच्या वेळी खासदार श बजरंग बप्पा सोनवणे, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड , ग्रामपंचायत अधिकारी श्रीराम वीर तसेच कपिलधारवाडी येथील केशव शिंदे, रुद्रसेन महाकले , सुदर्शन



शिंदे आणि पाली येथील संदीप नवले , अनिल सोळुंके , महेंद्र वीर इ . उपस्थित होते . या वेळी घटनेचा आढावा घेऊन ग्रामस्थांना मदतीचे आश्वासन देण्यात आले.

या घटनेचा सखोल आढावा घेण्यासाठी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ . ३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय अधिकारी बैठक झाली . या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग), वरिष्ठ भूवैज्ञानिक ,भूमी अभिलेख अधिकारी, गटविकास अधिकारी , नगर रचना अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, तसेच पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते . बैठकीत कपिलधारवाडी येथील घरांना व रस्त्यांना पडलेल्या भेगांबाबत , सुरक्षित पुनर्वसनाची व्यवस्था, तसेच तांत्रिक तपासणी अहवालानुसार पुढील उपाययोजना यावर ▶ उर्वरित पान २ वर

## अखिल भारतीय मराठा महासंघाची वरवटी व आहेर धानोरा शाखा उद्घाटन बीड रेल्वे स्टेशन जवळ

**बीड । प्रतिनिधी**

कुठल्याही संघटनेची संघटनात्मक बांधणी करायची असेल तर, शाकेपासून केली जाते,असे बीड जिल्ह्यातील गाव पातळीवर शाखा ओपनिंग व जुन्या शाखा ना परत चालू करून ग्रामीण भागातील सामाज बांधवांचा अडचणी सोडविण्यासाठी येथिल तसेच कै आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ कर्ज प्रकरणी अडचणी सोडण्यात येणार आहे शेतकरी बांधवांना साठी मदत केंद्र सुरू करण्यात येईल विविध




काम करण्यात येतील असे मनोगत मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले यांनी केले. अखिल भारतीय मराठा महासंघाने वरवटी व आहेर धानोरा रेल्वे स्टेशन जवळ बीड येथे ▶ उर्वरित पान २ वर

## सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा हा छोटासा प्रयत्न- एस. एम. देशमुख मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पूरग्रस्त पाच गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आणि तलावातील पाणी सोडल्याने अनेक गावांचे मोठे नुकसान झाले. याबरोबर गोदाकाठ आणि सिंदफणा काठावरील शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झालेले आहे. अनेकांची घरे वाहून गेली. अनेकांची घरे पडली. शेतकऱ्यांची शेती नेस्तनाबूत झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा



प्रयत्न मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आला. माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, डेपेगाव, सांडस चिंचोली, आळसे वाडी, गंगामसला या ठिकाणी परिषदेच्या वतीने गरजूना ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त देशमुख म्हणाले की पत्रकार हा समाजाचा घटक असतो आणि सामाजिक बांधिलकी म्हणून आमच्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाने आणि तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने

▶ उर्वरित पान २ वर

## मुख्याध्यापक गणेश वाघ यांना पितृशोक

**संपादक तथा संस्थाचालक गोविंदराव वाघ यांचे निधन ; शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील धांडे गल्ली येथील मूळ व सध्या यशवंत नगर भागातील रहिवासी असलेले साप्ताहिक कंकालेश्वर सम ाचारचे संपादक तथा शिवनेरी शिक्षण प्रसारक




मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ यांचे अल्पशा आजाराने आज बुधवार दिनांक ८ ऑक्टोबर२०२५ रोजी दुपारी तीन ▶ उर्वरित पान २ वर

## ओबीसी समाजाच्या महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व नियोजनासाठी तातडीच्या महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड येथे शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या ओबीसी समाजाच्या महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व नियोजनासाठी माजी खा. समीरभाऊ भुजबळ आणि आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या सूचनेनुसार बीड येथे म राठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील समता परिषद आणि विविध ओबीसी समाज संघटनांचे प्रमुख पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण



बैठकीचे आयोजन शुक्रवार दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरातील हॉटेल नीलकमल, नगररोड, बीड येथे सकाळी ११: ३० वाजता करण्यात आले असल्याची माहिती समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या अतिवृष्टी व संततधार पावसामुळे दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी होणारा ओबीसी समाज महाएल्गार मेळावा पुढे ढकलण्यात आला होता. आता सदरील नियोजित मेळाव्याची तारीख जाहीर करण्यात आली असून शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथे ओबीसी समाजाचा महाएल्गार म ेळावा ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब ▶ उर्वरित पान २ वर

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियानासाठी जास्तीत जास्त विभागाने प्रस्ताव सादर करावेत: उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) शैलेश सुर्यवंशी

**बीड । प्रतिनिधी**

कार्यालयाने केलेल्या कामाचे मुल्यमापन होण्यासाठी व नाविन्यतापूर्ण अभियान राबविल्याचा गौरव होण्यासाठी शासनाने आपल्याला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानातुन संधी उपलब्ध करुन दिली असून या अभियानातून बक्षिस प्राप्त होण्यासाठी जास्तीत जास्त कार्यालयांनी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याचे



आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेश सुर्यवंशी यांनी आज राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान बैठकी प्रसंगी केले. शासन दरबारी काम करत असतांना आपल्या कोणत्याच कामाची शासनस्तरावर दखल घेतली जात नाही असा आपला सूर असतो आपल्या बुध्दी कौशल्यातुन विविध प्रकारे कार्यालयीन कामात केलेला बदल,

▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र निदर्श



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते तथा संपर्कनेते अंबादासजी दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांच्या प्रमुख उपस्थितीत ▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**

युनोने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले. त्यानंतरची दहा वर्षे महिला दशक म्हणून जाहीर झाले. यावर्षी (२०२५) या घटनेस ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदने महाराष्ट्रातील महिलांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन अनेक उपक्रम हाती घेतले. त्यापैकी एक सार्वजनिक वाहन स्थानकांवर महिला किती सुरक्षित आहेत त्याचा लेखाजोखा. या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्राभर एस



टी बस स्थानके व रेल्वे स्थानकांचे सेफ्टी ऑडीट करण्यात आले.

माजलगाव विकास प्रतिष्ठानने माजलगाव व तेलगाव या बस स्थानकांचे नुकतेच सेफ्टी ऑडीट केले. या ऑडिट दरम्यान मि ळालेले अनुभव आणि निरीक्षणे यांच्या आधारे सुरक्षितता आणि मूलभूत हक्क या महत्त्वाच्या विषयावर आधारित पथनाट्याची निर्मिती करण्यात आली. या नाट्यप्रयोगाद्वारे सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणि प्रत्येक नागरिकाचे मूलभूत हक्क यांविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नवरात्र महोत्सवात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असतो. त्या निमित्ताने हे पथनाट्य वेगवेगळ्या ठिकाणी सादर करण्यात आले. यामागे सामाजिक जागृतीचा संदेश देण्याचा ▶ उर्वरित पान २ वर

## शासनाने काल शेतकरी बांधवांना केलेल्या मदतीच्या घोषणा म्हणजे ऐणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडनुका डोळ्यासमोर ठेवून घेतलेला निर्णय ; विशाल इंगोले , आण्णासाहेब जाधव

**बीड । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाने बैठक घेऊन शेतकरी बांधवांना अतिवृष्टीने नुकसान भरपाई च्या रक्कमा जाहीर केल्या या घोषणा म्हणजे अवघ्या काही दिवसांवर आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडनुका डोळ्यासमोर ठेवून घेतलेला निर्णय आहे मदत करायची होती तर एवढ्या ऊशिरा का ज्या दिवशी सर्व शेतकऱ्यांचे नुकसान झाले पिके गेली जनावरे वाहुन गेली त्या वेळी का तातडीने आर्थिक मदत का दिली नाही पिक कर्ज माफी का केली नाही असे असताना आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडनुका लवकरच लागणार असुन लाडक्या बहिणीला खुष केले तसेच आता लाडका शेतकरी खुष करण्यासाठी हा खटाटोप सुरू आहे पण आता बळीराजा अश्या अमिषाला बळी पडणार नाही व सरकारचे बळीराजा प्रती असलेले बेगडे प्रेम हे ऐत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडनुका डोळ्यासमोर ठेऊन घेतलेल्या निर्णया पुरते मर्यादित आहे असेही विशाल इंगोले व आण्णासाहेब जाधव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# भूस्खलन ग्रस्त कपिलधार वाडी व पूरग्रस्त शिवणी गावातील विद्यार्थीनां शैक्षणिक साहित्य वाटप

**आदित्य दहिवाळ, विनोद चव्हाण सह मित्र परिवार यांचा उपक्रम**




**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री क्षेत्र कपिलधार येथील वाडी वर भूस्खलन झाल्यामुळे जमीन खचली रस्त्यावर ५ फूट ते ८ फूट भेगा पडल्या घरांच्या , शाळेच्या भिंती ला तडे गेले, तर काही घर ढासळली अश्या तसेच या वर्षी प्रचंड पाऊस अतिवृष्टी मुळे शेतकरी यांचे शेतातील उत्पन्न सह जमीन वाहून गेल्या मुळे, प्रचंड नुकसान झाले, अश्या वेळी मनाने खचून गेलेले शेतकरी बांधव यांना फुल न फ ुलाची पाखळी मनून बीड तालुक्यातील शिवणी या गावातील विद्यार्थी यांना पण सर्व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले, हा सामाजिक उपक्रम आदित्य दहिवाळ, विनोद चव्हाण, व मित्र परिवार यांच्या वतीने घेण्यात आला, कपिल धार वाडी ची पाहणी करून दोन्ही गावातील अंगणवाडी ते इय्यता १ ली ते १० वी पर्यंत च्या सर्व विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य मध्ये बॅग, पाणी बॉटल, प्रत्येकी लहान विद्यार्थी ना ४ व मोठ्या विद्यार्थी ना ५ वह्या, कॉम्पॉस, जेवणाचा डब्बा, सह सर्व शालेय किट देण्यात आली, तसेच असे आणखी उपक्रम इतर पूरग्रस्त गावात पण घेण्यात येणार आहेत असे या वेळी आदित्य दहिवाळ व विनोद चव्हाण यांनी बोलताना मनाले, हा उपक्रम सामाजिक बांधिलकी मनून पिचलेला खचलेला शेतकरी बांधव यांच्या मुलं - मुलीं ना शैक्षणिक आधार नक्कीच होईल, व इतरांनी पण असे उपक्रम ज्या गावातील विद्यार्थी यांना मदत पोहचली नाही त्यांना पण आप आपल्या परीने मदत नव्हे कर्तव्य मनून असे उपक्रम घ्यावेत असे आवाहन करण्यात आले, या वेळी आदित्य दहिवाळ, विनोद चव्हाण, रमेश चौरे, बालाजी बेद्रे, विजय सुपेकर, विजय कुटे, भैय्या कुटे, सोमनाथ घोडके, नाना स्वामी सह शिक्षक शिक्षिका व गावकरी उपस्थित होते.